# कबुली : कन्फेशनच्या वाटेने जाणारी

फ. म. शहाजिंदे

**लेखक म्हणून मुस्लिम समाजाने माझा गौरव केलाच, तर त्यांनी केलेल्या सत्काराला मी त्यांच्यासमोर मनमोकळेपणाने पुढील उत्तर देऊन अंत:करण हलके करून घेईन :**

डॉ. असगरअली इंजिनिअर आणि प्रा. फक्रुद्दीन बेन्नूर यांच्याइतकी जागतिक संदर्भात कुरआनचा अन्वयार्थ स्पष्ट करण्याची कुवत माझ्यात नाही; की अब्दुल कादर मुकादम आणि डॉ. अलीम वकील, डॉ. मुहम्मद आझमएवढी अभ्यासू चिकित्सक, तौलनिक दृष्टीही नाही; की इलाही जमादार





Date of Publication : 12-11-2020

आणि ए. के. शेख यांच्याएवढी लयकारीही माझ्या लेखनात नाही. कारण मी असायलाच मुळात एक ओबडधोबड गद्य माणूस असून, सरळसोट आहे. तरीही माझा गौरव होतो आहे, याचे कारण बहुतेक माझ्या लेखनातील अनुभवांची विविधता असावी, असे मला वाटते.

सर्वांत आधी मी स्वतः एक सामान्य माणूस आहे, नंतर मग एक सामान्य मुसलमान आहे. मला माझे सामान्यपण प्रिय आहे. मला माझे सामान्य जगणेही प्यारे आहे. मला सतत सामान्य असणे आवडते. ते कधी मी सोडले नाही की कधी सोडणारही नाही. कारण आयुष्यात जेव्हा जेव्हा माझा अपमान झाला, तेव्हा मी स्वतःला साधा माणूस समजत असल्याने त्या अपमानाचे मला काहीच वाटले नाही; की कधी लेखक म्हणून मोठेपण मिळाले, तरी मी हुरळूनही गेलो नाही. अगदी कमी वयाचा लेखकही मला माझ्या चुका दाखवून माझा मित्रही राहू शकतो. अंगी सामान्यपण बाणवून घेण्याचा हाच तर सर्वांत मोठा फायदा आहे. याशिवाय आपल्या डोक्याला ताप होत नाही. तात्पर्य असे की– एका साध्या, सरळ, सामान्य माणसाच्या लेखनातील अनुभवविविधतेवर आपण प्रेम करता म्हणून हा गौरव होतो आहे, अशी माझी भावना आहे.

मी एक साधा मुसलमान असल्याने माझ्या गरजेपुरता इस्लाम मला माहीत आहे. माझा भोवताल मला सुन्नी मुसलमान म्हणतो. पण सुन्नींचे पंथोपपंथ मला माहीत नाहीत, की त्यांच्या वेगळेपणाची वैशिष्ट्येही माहीत नाहीत. त्यावर कधी खेडेगावात फारशी चर्चाही होत नाही. त्यामुळे माझे मुसलमानपण कोणत्या स्वरूपाचे आहे, ते याप्रसंगी तरी सांगायला हवे. माझा जन्मच मुळी पाच–सहा मुलींनंतर धीर धरता आला नसल्याने, थोर सूफी संत महेबूब सुभानींना केलेल्या नवसानंतर– म्हणजे मन्नत मागितल्यानंतर– झालेला आहे. ‘या महेबूब सुभानी, मला मुलगा होऊ दे! मुलगा झाला तर मी तुझी दर वर्षी ग्यारवी करीन. बकरं कापून फकिरांना जेवू घालीन. गुळाच्या मलिद्याचे व खोबऱ्याच्या वाटीचे अकरा–अकरा दिवे लावीन आणि होणाऱ्या मुलाचे नावही फकीर ठेवीन.’ ही माझ्या आईची मन्नत होती. या मन्नतीनुसार आईने बकऱ्याची कंदुरी करून सर्व सोपस्कारांसह आयुष्यभर आणि काहीही करून ग्यारवी तर केलीच अन् मलाही काकुळतीने निक्षून सांगितले, ‘फकीर, कुछ भी कर मगर महेबूब सुभानी की ग्यारवी कर.’

माझा सुन्नी पंथ मला बारकाव्यांसह माहीत नसला, तरी मला माझी जात माहीत आहे. कारण जात माहीत असल्याशिवाय इथला व्यवहारच चालू शकत नाही. माझी जात महाराष्ट्रातील त्रेचाळीस भटक्या जातींपैकी एक असलेली आहे. त्यातही उपजाती आहेत, पण मला त्या माहीत नाहीत. ही जात सूफींच्या प्रभावाने मुसलमान झाली. सामान्यतः स्त्री–पुरुष जेव्हा आई–बाप होतात, तेव्हा ते ज्या देशाच्या प्रदेशाचे– ज्या जातीचे– ज्या धर्माचे– ज्या संस्कृतीचे आणि ज्या भाषेचे असतात; ते–ते सर्व त्यांच्या मुला–मुलींना आपोआप, विनासायास, न मागता फुकटात मिळत असते. वारश्यात मिळालेले हे सर्व वयानुसार त्या–त्या मुला–मुलींच्या रक्तात भिनत जाते. स्वभावात मुरत जाते. भारतीय पर्यावरणात उच्चवर्णीय अश्रफ मुसलमानांच्या दृष्टीने मी एक सामान्य बाटगा मुसलमान आहे, नवमुस्लिम आहे. तसे आपले पैगंबरसाहेबदेखील नवमुस्लिमच आहेत. कारण सर्वश्रेष्ठ अल्लाहने दिव्य बोधाद्वारे जो नवा धर्म सांगितला तो त्यांनी मनापासून तत्परतेने स्वीकारला आणि आयुष्यभर अनंत अडचणींना तोंड देत तोच धर्म सांगितला. पैगंबरसाहेबांनी हा नवा धर्म अरबांना सांगितला, तोच धर्म भारतातील सूफींनी आमच्या पूर्वजांना सांगितला आणि तो आमच्या पूर्वजांनी स्वीकारला. माझे पूर्वज मुसलमान होते, म्हणून मीही मुसलमान आहे. म्हणून कोणताही मुसलमान मला मुसलमान म्हणून मान्य असतो. त्यांच्या पंथउपपंथावरून अथवा त्यांच्या जातीवरून भेदभाव करण्याच्या भानगडीत पडत नाही. कारण मी अनेकेश्वरवादी लोकांबरोबर सुखाने राहतो आहे, तर मग वेगळ्या मुसलमानांबरोबर का बरे राहू नये? तसेच मी काही अस्सल, कट्टर मुसलमान नाही. कारण कोणत्याही मुस्लिमांच्या मनात अढळ स्थान असलेल्या ज्या–ज्या श्रद्धा आहेत, जी–जी तत्त्वे आहेत आणि ज्या मान्यता आहेत; त्यांतील आपल्याशी जुळणाऱ्या श्रद्धा, तत्त्वे व मान्यतांवर लक्ष केंद्रित करायचे. मतभेदांना बाजूला सारून त्यांच्या मुसलमान असण्यावर माझे भागत असते. म्हणून कोणत्याही मुसलमानाबरोबर माझा संवाद होऊ शकतो. मी स्वतःला शुद्ध, उच्चकुलीन, खराखुरा, शुद्ध पाक, असली मुसलमान आहे असे समजत नाही. मी फक्त जातीपंथाला महत्त्व न देणारा भारतीय मुसलमान आहे.

तुम्ही माझा हा जो गौरव करीत आहात, तो मी कसला का असेना, मुसलमान आहे म्हणून करीत आहात का? तर, तसेच काही नसावे, असे मला वाटते. कारण या समाजात

मूळचेच दारिद्र्य अफाट आहे. त्यामुळे उच्चशिक्षितांचे प्रमाणही अत्यल्प आहे. असा खर्च करणे आपल्या बजेटमध्ये बसत नाही. याशिवाय उच्च शिक्षणाला आपला समाज मनापासून खरे शिक्षण समजत नसल्याने सार्वत्रिक मान्यताही नसते. म्हणून मुस्लिम समाजात असे प्रसंग दुर्मिळच घडत असतात. कारण सध्या समाजात चार-दोन उच्चशिक्षित, समजूतदार माणसं धडपडू लागलेली दिसून येत आहेत. त्यांना असे वाटू लागलेले आहे की, आपण धर्मनिरपेक्ष लोकशाही व्यवस्थेत जगत आहोत. या व्यवस्थेत सर्वसामान्य मुसलमान समाजाची सुख-दुःखे कळवळ्याने जो मांडतो आहे, मुस्लिम मराठी साहित्याची एक बाजू जो

**लोकशाहीत क्षुल्लक व किरकोळ धर्मांतर होतच असते. त्याचे सुख-दुःख मानण्याची, अभिमान अथवा हिरमोड करून घेण्याची गरज नाही. विविध हेतूंनी अथवा कारणांनी इकडचे तिकडे येत-जात असतात.**
**तिकडे लक्ष देण्यापेक्षा आपल्या खऱ्या दीनकडे आणि आधुनिक शिक्षणाकडे सारा जोर लावला पाहिजे. आपण आपली शैक्षणिक समृद्धी वाढवण्यासाठी झटले पाहिजे. प्रपंच करून इबादतीबरोबर आपण सगळ्यांनी हेच केले पाहिजे. तरच आपल्या समाजाचा हरवलेला आत्मा पुन्हा गवसेल. जगाकडे डोळे लावून बसण्यापेक्षा आपल्या समाजाकडेच विशेष लक्ष पुरवले पाहिजे, कारण आजच्या काळात 'या शेख अपना अपना देख' हीच म्हण खरी ठरते आहे.**
**आपल्याला कामातून मोकळे झाल्यानंतर इबादतीच्या परिश्रमाला लागायला हवे. कारण मुसलमानांनी कयामतीचा क्षण येईपर्यंत निरंतर कर्म करीत राहिले पाहिजे.**

सातत्याने मांडतो आहे- त्याचा आपण गौरव करायला हवा. त्यांना असे वाटत असल, तरी काही होत नसते. त्यामुळे त्यांना आपला विचार भोवतालच्यांना सांगून-सांगून सहमती निर्माण करावी लागते. मग त्यातून असे गौरवाचे प्रसंग साकार होत असतात.

आज इथे जो माझा गौरव होतो आहे, तो एक सामान्य असलेल्या मुस्लिम लेखकाचा आहे, ज्याने आयुष्यभर सामान्यांची सुख-दुःखं मांडली आणि मुस्लिम मराठी साहित्याची एक बाजू सतत लावून धरली. म्हणून हा गौरव माझ्या एकट्याचा नाही, तर अशा प्रकारचे लेखन करणाऱ्या सर्वच मुस्लिम मराठी लेखकांचा आहे. कारण आत्तापर्यंत इतर जातिसमूहाचे जाऊ द्या; खुद्द मुस्लिम जातिसमूहाचाच असा समज होता की- मुसलमानांना कुठे मराठी साहित्य निर्माण करता येते का? हा गौरव या गैरसमजाला नुसते तडकावून टाकत नाही, तर इतर समाजासह मुस्लिम समाजही या मुस्लिम मराठी साहित्याला मान्यता देत आहे, याचा एक सज्जड पुरावा आहे. हा सामान्यांनी एका सामान्य लेखकाचा केलेला गौरव आहे. आजपर्यंत हिंदू-मुस्लिम समाजात उच्चकुलीन अश्रफ-ब्राह्मण अभिजनांच्या बाबतीत वर्चस्व होते. हा गौरव अभिजनांचे सांस्कृतिक वर्चस्व झुगारून दिल्याचा पुरावा आहे.

तुम्ही तुमच्या आनंदात मला आणि माझ्या आनंदात मी तुम्हाला सहभागी करून आपली मनं धन्य-धन्य झालेली आहेत, हीच या गौरवाची कमाई आहे. मी फार शहाणा आहे, असे मुळीच नाही. आणि तुम्ही फार दुधखुळे आहात, असे तर अजिबातच नाही. मोठेपणाचा आव आणून चार गोष्टी शहाणपणाच्या सांगण्याचा हा काळ नाहीय. केवळ माझेच म्हणणे तंतोतंत खरे आहे, असे म्हणत अलग गट स्थापन करून उचापती करण्याचा हा काळ आहे. त्यामुळे आपण सगळे आतून फार-फार दुःखी आहोत, तुटून-तुटून विखुरलेले आहोत. त्या दुःखी मनांवर हा गौरवाचा कार्यक्रम जणू काही फुंकर मारतो आहे, असे मला वाटते आहे. असा गौरव होईल असे मला मुळीच वाटले नव्हते, पण तो होत आहे. या कार्यक्रमाद्वारे ज्यांनी-ज्यांनी आपल्या आतल्या दुःखांवर फुंकर मारलेली आहे त्यांचे आणि ज्यांनी-ज्यांनी ही फुंकर अनुभवली त्यांचेही मी व्यक्तिशः आभार मानतो.

पैगंबर(सल्ल.)साहेबांनी जे-जे आपल्यापर्यंत पोचविलेले आहे, ते-ते सर्वांत महत्त्वाचे आहे. अल्लाहने जे-जे दिले, त्याची प्रत्यक्ष जीवनात अंमलबजावणी करून पैगंबर (सल्ल.)


Date of Publication : 12-11-2020

साहेबांनी प्रत्यक्ष जगण्याचा एक आदर्श आपल्यासमोर ठेवलेला आहे. या प्रत्यक्ष जगण्याच्या आदर्शाप्रमाणे सूफी जगले. आपणही त्याच वाटेवरून प्रवास करीत आहोत. तत्त्वांनुसार, आदेशांनुसार, सांगितलेल्या मूल्यांनुसार, आखून दिलेल्या नियमांनुसार प्रत्यक्ष जगणे मूळ तत्त्वांहूनही अधिक महत्त्वाचे असते. कारण तत्त्वमूल्ये ही तत्त्वेमूल्ये म्हणून ठीक असली, तरी त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली तरच ती महान ठरतात. त्यांची जाणीव असली, तरच त्या तत्त्वमूल्यांची प्रत्यक्ष जगण्यात आपण आपल्या सोईनुसार, स्वार्थानुसार कशी वासलात लावलेली आहे, तेही कळत जाते. हे स्वतःच स्वतःचे केलेले आत्मपरीक्षण खूप महत्त्वाचे असते. कारण मी स्वतः किती टक्के योग्य मुसलमान आहे, ते कळून येते. मला कळले, तरच माझ्या आचरणात फरक पडून सुधारणा होईल. कळले, तरच प्रायश्चित्त घेता येईल. म्हणून प्रत्यक्षात मूळ तत्त्वमूल्यांच्या जास्तीत जास्त चर्चेपेक्षा आपल्या रोजच्या वास्तव जगण्याची चर्चा अधिकाधिक करायला हवी, तरच आपला समाज अंतरंगासह कळेल. त्यामुळे त्यातल्या उणिवा कळतील, त्यावर उपाय करता येतील. मुस्लिम मराठी साहित्यात मुस्लिम समाजाचे अंतरंग बहिरंगासह चित्रित झालेले आहे, ते मुस्लिमांनी वाचायला हवे; तरच मूळ इस्लाम आणि प्रत्यक्ष जगण्यातला इस्लाम यात विविध कारणांमुळे पडलेला फरक कळेल. एक मुसलमान माझ्याशी भांडू लागला की, इस्लाममध्ये जाती वगैरे काही नाहीत. इस्लाममध्ये अंद्धश्रद्धा नाहीत, भेदभाव-उच्चनीच भाव नाहीत. वर्णबिर्ण तर नाहीच नाहीत. स्त्रियांना तर उलट इतरांपेक्षा सर्वांत जास्त अधिकार दिलेले आहेत. मी म्हटलं, खरं आहे; पण ते सारे मूळ इस्लामच्या तत्त्वमूल्यांत आहे, मात्र प्रत्यक्ष जगण्यातल्या इस्लाममध्ये नाही ना! अरबस्तान अरबी माणसात आहे; पण माझ्यात माझा महाराष्ट्र आहे, माझ्यात भारत आहे- ते तुम्ही का व कसे नाकारणार? आदर्शांहून अधिक वास्तवाची चर्चा झाली, तर आपल्यात सुधारणेच्या दुरुस्त्या करता येतील.

अल्लाहने जे-जे दिले, ते-ते सर्व पैगंबरसाहेबांनी आपल्यापर्यंत पोचविले. पण नंतरच्या काळात परिस्थितीनुरूप त्यात काही बदल झाले, त्या बदलांची परंपरा झाली. त्या परंपरेचे कायद्यात रूपांतर झाले. आज या अनेक परंपरांपैकी काही परंपरा, काही कायदे अडचणीचे वाटत आहेत. मूळ पैगंबरसाहेबांच्या म्हणण्याशी ते विसंगत वाटत असतील, तर या परंपरा व कायद्यांवर अडून न बसता आपले धर्मपंडित असलेल्या सर्व उलेमांनी एकत्र येऊन त्या विसंगत कायदे व परंपरांचा पुनर्विचार करायलाच हवा. पैगंबरसाहेबांच्या म्हणण्यानुसार त्या विसंगत परंपरा, कायदे, रूढी काळानुसार बदलून टाकायलाच हव्यात; हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. तसेच भारतातील सर्व जाती-पंथांतील उलेमांनी समाजाच्या कल्याणासाठी फिरक्यांमधील मारामाऱ्या, भांडणे, शत्रुत्व संपवण्यासाठी सतत एकत्र येऊन, चर्चा करून, आपापसातील संवादांची मालिका निर्माण करून, फिरक्या-फिरक्यांमधील भांडणे मिटवली पाहिजेत. मग मुसलमानातील जातिव्यवस्था संपवण्याच्या दिशेने प्रवास करीत राहिले पाहिजे.

फिरक्या-फिरक्यांमधील शत्रुत्व आणि जाती-वर्णभेदावर उलेमामंडळी कठोर प्रहार करीत राहिली, तर ती समाजाची फार मोठी खिदमत होईल. उलेमामंडळींनी असे सतत केले तर समाजही त्यावर चर्चा करील, विचार करील. आपल्या समाजाची जातींमुळे विभागणी झाल्याने, फिरक्यांमुळे तुकडे-तुकडे झाल्याने आपली शक्ती कमी झाली का वाढली? शिवाय हे फिरके, हे जाती-वर्ण अल्लाहने, पैगंबरसाहेबांनी निर्माण केलेले नाहीत. नंतरच्या माणसांनी जे चुकीचे निर्माण करून ठेवलेले आहे, ते आज मोडून टाकायलाच हवे; तरच मुस्लिम समाजाची शक्ती वाढेल, शत्रुत्व व भेदभाव संपल्याने इस्लामने सांगितलेली समता वाढेल, भाईचारा वाढेल, न्याय वाढेल. त्यासाठी उलेमांना समाजानेही प्रतिसाद देण्यासाठी- 'माझेच खरे'चा दुराग्रह, 'आम्हीच श्रेष्ठ'चा अहंगंड आपणहून सोडून द्यायलाच हवा. हिरीरीने भांडण्याचा आग्रह सोडून देऊन मतभेद असणाऱ्या मुसलमानांशी सतत भेटत राहू, बोलत राहू. हे करण्यासाठी एक सूत्र अमलात आणू या की- वैयक्तिक मतभेदाचा आग्रह दुनियादारीच्या व्यवहारात न आणता, तो आपल्या इबादतीपुरता मर्यादित ठेवू. आपल्या श्रद्धा आणि मान्यतांपुरता मर्यादित ठेवू. म्हणजे दुनियादारीतील व्यवहार सुरळीत चालून आपल्यातील भांडणे-मारामाऱ्या तर थांबतील. म्हणजे फिरक्यांप्रमाणे इबादत करा अन् केवळ मुसलमान म्हणून दुनियादारीतील व्यवहार करा- हा मध्यम मार्ग आहे. असा मार्ग अल्लाहदेखील पसंत करतो. अल्लाहने म्हटले आहे की, जो तुम्हाला सलाम करील, त्याला म्हणू नका की 'तू श्रद्धावंत नाहीस.' आपण तर आज पावला-पावलांवर 'तू काय मुसलमान आहेस? तू कसला मुसलमान? तू काही खरा मुसलमान नाहीस.' असे म्हणतो; पण अस्सल

ओरिजनल मुसलमान कोण आहे, ते आज शोधण्याची वेळ आलेली आहे, इतके आपण एकमेकांना नावे ठेवत असतो. इस्लामचे सगळे अधिकार आपल्या ताब्यात घेऊन जे आपण अंतिम निर्णय देत बोंबलत हिंडतो, ते खरोखरच बंद व्हायला हवे. कारण अंतिम निर्णय अल्लाहचा असतो, हे आपल्याला कळायलाच हवे. मुस्लिम समाज आपसात असाच आतून धुमसत राहिला, तर त्याचा भविष्यकाळ अंधकारमयच असेल ना? म्हणून आपसातील भांडणे, भेदाभेद, खरा-खोटा मुसलमान ठरवण्याची स्पर्धा थांबवू या. वंशाचा, उच्चतेचा, कुलीनतेचा अभिमान- इबादतीचा अभिमान सोडून देऊ या अन् प्रेमाने भाजी-भाकर खाऊन सुखाने राहू या.

मुसलमानांना मुसलमान म्हणून काही समजावून सांगणे आणि त्यांना अंतर्बाह्य समजून घेणे खूप अवघड होऊन बसलेले आहे. मुसलमान त्यांच्या-त्यांच्या उलेमांवर आणि आपापल्या मशिदीच्या पेशइमामांवर पूर्णपणे विसंबून असतात. उलेमा आणि पेशइमामाचा शब्द त्यांच्यासाठी शेवटचा असतो. तसे पाहिले तर ते स्वाभाविकही व साहजिकही आहे. कारण प्रत्येक समस्येचे, अडी-अडचणीचे उत्तर धार्मिक चौकटीत उलेमा आणि पेशइमामाकडेच मिळत असते. म्हणून मुसलमान सहजासहजी कशानेही बदलत नाहीत. कारण त्यांना जी कोणती प्रादेशिक भाषा येत असते, त्या भाषेत इस्लामचे विवरण फारसे सापडत नाही. जे सापडते, ते अरबी भाषेच्या ढंगाने अनुवादित केलेल्या स्वरूपात सापडते. त्यामुळे त्यातले काही कळते, तर काही कळतच नाही. ही वाचता येणाऱ्या मुसलमानांची अडचण असते. बहुतेक मुसलमानांना मुळातच काही वाचताच येत नाही, कारण शिक्षणच नाही. 'पैगंबरसाहेबांना तरी कुठे लिहिता-वाचता येत होते?' असा प्रश्न स्वतःला विचारून स्वतःचे समाधान करून घेऊ शकतो; पण त्यांची बरोबरी आपण कुणीही कोणत्याही बाबतीत करू शकत नाही. अशा खोट्या सांत्वनाने आपण परावलंबी होत जातो. विचार करणे, स्वतः वाचन करणे, स्वतः निर्णय घेणे टाळत राहतो अन् उलेमा-पेशइमाम म्हणतील ते खरे मानतो. म्हणजे उलेमा-पेशइमाम यांनी काही सांगितले तरच हा समाज जागा होतो, जागृत होतो; अन्यथा नाही. उलेमा-पेशइमामांमुळेच हा समाज बदलू शकतो. तसेच 'परिस्थितीच्या रेट्यात, दबावाखाली जो बदल होत जातो त्याला मात्र सगळेच नाके मुरडत नाइलाजाने मूकसंमती देऊन टाकतात. त्यातही परत अनेकानेक फिरक्यांचे, पंथ-उपपंथांचे प्रमुख उलेमा-पेशइमाम वेगवेगळे असतात. त्यांना एकत्रित आणणेच कठीण असते. ते आतून इतके विभागलेले असतात की, त्यांना हुकूमशहाच गप्प करू शकतो. पैगंबरसाहेबांच्या भाकितातच मुळी विविध फिरके, पंथोपपंथ निर्माण होणार आणि त्यापैकी एकच सत्याच्या मार्गावरील पंथ अथवा फिरका स्वर्गात जाणार, असे आहे. म्हणून प्रत्येक फिरका किंवा पंथ 'आम्हीच खरे उपासक आहोत, आम्हीच खरे मुसलमान आहोत, आम्हीच सत्याच्या मार्गावर आहोत म्हणून आम्हीच स्वर्गात जाणार' यावर न थकता चर्चा करीत राहतात. यावर तुमच्याकडे काही सडेतोड आध्यात्मिक उत्तर असेल, तर तुम्ही या अशा मुस्लिम समाजात काही बदल करू शकता; अन्यथा परिस्थितीच्या रेट्याने जो बदल होतो आहे, तेवढाच होत राहणार आहे. बाकी काही बदल मुसलमानात होणे शक्य नाही. कारण मुसलमानांचेच मुसलमानांशी पटत नाही, जमत नाही. नुसता कुरबुरींचा उरूस भरलेला असतो.

भारतातील मुसलमानांत बहुसंख्य असलेल्या सुन्नीपंथीय मुसलमानांत एकमत झाले तर ते बहुतेक धार्मिक तरी असते, नाही तर सगळ्यांच्याच जीवावर बेतल्यावर तरी होते. सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय एकमत होत नसल्यानेच भारतात मुसलमानांचा नेता कुणी होऊ शकत नाही. तसेच कुणी संपूर्ण समाजाला मार्गदर्शन करू शकेल असा सामाजिक-सांस्कृतिक मार्गदर्शकही होऊ शकला नाही. कारण मुसलमानांचे सारे जीवनच धर्ममय असते. कुरआनमय असते. मुसलमान आपल्या जीवनातील विविध अंगांचा वेगवेगळा विचार करीत नाहीत. धर्मकारणातच राजकारण, समाजकारण, अर्थकारण इत्यादी सगळे असते- यावर इथल्या मुसलमानांची अढळ श्रद्धा असते- कारण कुरआनात तसे आहे. कुरआनात सगळे आहे. त्यामुळे धर्मनेत्यातच साऱ्या जीवनक्षेत्रांचे ज्ञान असते, असायलाच हवे. धर्मनेताच राज्यकारभार करेल, युद्धभूमीवर लढेल, मशिदीत नमाजानंतर प्रवचनही देईल आणि साऱ्या समाजाचे नेतृत्वही करेल. ईश्वर एक आहे, ईश्वरांनी दिलेला धर्मग्रंथ एक आहे. जीवन एक आहे. जगणे-मरणे एक आहे. त्यात काळानुसार, परिस्थितीनुरूप, गरजेनुसार धर्मनेत्या धर्मपंडितांनी कुरआनचा त्यांना भावलेल्या-पटलेल्या अर्थानुसार पैगंबरसाहेबांच्या वचनांच्या प्रकाशात आणि स्वतःच्या तर्कानुसार जो बदल केला, त्या बदलांच्याच परंपरा झाल्या.

त्या परंपरांचे कायद्यातही रूपांतर झाले. असा हा इस्लामी समाज आपल्या धर्मासह जगभर गेला. जिथे-जिथे गेला तिथे-तिथे स्थानिकही त्यात मिसळत गेले, जिथे गेला तिथला भूगोलही त्याच्या साऱ्या वैशिष्ट्यांसह मिसळत गेला. त्यात राजांची राजकीय सोयही राजदरबारातील उलेमांनी मिसळवून टाकली. अशा रीतीने मूळचा इस्लाम आणि आजची इस्लामी आचारतत्त्वे यामध्ये फरक पडत जाऊन धार्मिक गुंता वाढत गेला. हा गुंता धर्मपंडित उलेमांनी एकत्र बसून गंभीरपणे सोडवायला हवा. मूळ इस्लामच अनेक फिरक्यांत-पंथोपपंथात सतत विभागत राहिल्याने गट-तट वाढत जाऊन उलेमांचीही पंचाईत झाली. तेही मग आपल्या फिरक्या-पंथाप्रमाणे इस्लामच्या मूळ बाबींचा अन्वयार्थ शोधत राहिले. जे उलेमा नाहीत, पण अभ्यासक-चिंतक आहेत, त्यांचा अन्वयार्थ समाजाने कधीच मान्य केला नाही. त्यामुळे इथला मुस्लिम समाज नेतृत्वहीन, दिशाहीन, आत्माच हरवल्यागत झाला आहे. हरवलेला आत्मा परत गवसायला सगळे फिरके-पंथ आपसातील साम्यस्थळांवर तरी एकत्र येऊन आपासात सामोपचाराने सतत बोलत राहिले, तर काहीएक मार्ग मिळेल. असे व्हावे, याचे मी माझ्या मनातल्या मनात स्वप्न पाहत असतो. कारण मला वाटत आले आहे की, या समाजाला नेतृत्व मिळायला हवे. या समाजातला सगळा गुंता उलगडला गेला पाहिजे, या समाजाचा हरवलेला आत्मा परत मिळायला हवा. हे मी जे सांगतो आहे, ते तुम्हाला समजावण्यासाठी नव्हे. माझ्या मुलांना मला समजावता आलं नाही, तर मी तुम्हाला कसे काय समजावू शकेन? हे माझे स्वप्न तुम्हास सांगतो आहे ते या गौरवामुळे संधी मिळाली आहे म्हणून; तुमच्यासमोर माझा शहाणपणा पाजळण्यासाठी नव्हे. ही माझी दिल की बात आहे.

मी साधा, सरळ, खेडुत मुसलमान आहे. इथे मुसलमान म्हणून जगताना या लोकशाही व्यवस्थेत माझ्यासमोर काही प्रश्न उभे ठाकलेले आहेत. या सतावणाऱ्या प्रश्नांची उत्तरं मला मिळत नाहीत. माझी मला उत्तरं मिळाली, तरी त्याने माझे समाधान होत नाही. या प्रश्नांची उत्तरं उलेमा व पेशइमामांनी, इस्लामच्या अभ्यासकांनी अथवा चिंतकांनी शोधून दिली तर चालतील. या उत्तरांमुळे माझे नव्हे, तर माझ्यासारख्या अनेकांचे जगणे सुसह्य होण्याची शक्यता आहे.

इस्लाम एक आदर्श धर्म असून माणसाची सतत परीक्षा घेण्यासाठी जन्माला आलेला आहे. पूर्वीच्या धर्मग्रंथांत जे सांगितले गेले आहे, तेच अरबी भाषेत या धर्मात सांगितले गेले आहे. हा धर्म न्यायी, मानवी, परोपकारी आणि वैश्विक असला तरी त्याला आत्ता संस्थापक रूप प्राप्त झाले आहे, त्यामुळे माणसांनी अनेक घोटाळे त्यात निर्माण करून ठेवलेले आहेत. कारण माणूस दुबळा, स्वार्थी, चंचल, कृतघ्न आणि भांडखोर असून मोहांना सहजासहजी बळी पडणारा आहे. हा धर्म सत्य बोलायला सांगतो. नुकसान होत असले तरी सत्याची साक्ष द्यायला सांगणारा, सत्याप्रमाणे वर्तन करायला सांगणारा हा धर्म आहे. जीवन जगताना स्वार्थ आडवा आला की, माणसांकडून सत्याचे उल्लंघन होत असते. ते माणसाच्या नंतर लक्षात येते. तेव्हा तो क्षमा तरी मागतो किंवा प्रायश्चित्त तरी घेतो. काही जण तर आपल्याकडून सत्याचे उल्लंघनच झालेले नाही, यावर अडून बसतात. म्हणून आदर्श इस्लाम आणि प्रत्यक्ष जगण्यातला इस्लाम यात फरक पडत जातो. कधी-कधी मी सत्याला अक्कलहुशारीने बगल देतो, ही माझी चूक माणसाची आहे; इस्लामची नाही. असे म्हणून इस्लामचे आदर्शपण जपण्याच्या नादात आपण कोणतेही आदर्श प्रत्यक्ष आचरणात आणल्याशिवाय ते अर्थपूर्ण ठरूच शकत नाही, याचा आपण विचारच करीत नाही. कधी-कधी समाजव्यवस्थाच आदर्शांना मुरड घालायला भाग पाडते. जसे- माणसाकडून चक्रवाढ व्याज खाऊ नये, असे एक अर्थशास्त्रीय आदर्श तत्त्व आहे. या तत्त्वाप्रमाणे काही जण व्याज खात नाहीत. काही जण वैयक्तिक पातळीवर माणसाकडून व्याज घेत नाहीत; तर बँका, सरकार यांच्या विविध योजनांमधून मिळणारे व्याज घेतात. आपला विमा आपण काढतो, भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज आपण घेतो. बँकेत आपल्या खात्यावरील शिल्लक रकमेवरही बँक व्याज देत असते. काही जण ही व्याजाची रक्कम दानात देऊन टाकतात. तर माझ्यासारखे बहुसंख्य 'मी काय वैयाक्तिक माणसांकडून व्याज घेतो आहे का? सरकारी बँकाचे व्याज घेतो आहे. सरकारी तिजोरीत ठेवलेल्या म्हणजे बैतुलमालमध्ये ठेवलेल्या रकमेवर प्रत्यक्ष राज्याचे कारभारीच केलेल्या कायद्यानुसार व्याज देत असतात. धर्माचा असा स्पष्ट आदेश कुठे आहे की राज्याच्या कारभाऱ्यांकडून व्याज घेऊ नये?' मी स्वार्थासाठी व्याजाविषयीच्या आदेशातील सत्याला अशी मुरड घालतो. हे चूक की बरोबर, यावरील चर्चा खेड्यापाड्यापर्यंत येत नाही. जेव्हा हे जाणवते, तेव्हा मी माफी मागतो आणि


Date of Publication : 12-11-2020

प्रायश्चित्त करतो. असे क्षमायाचनेचे नि प्रायश्चित्त घेण्याचे प्रसंग आयुष्यभर येत राहतात. मी जमेल तसे, जमेल तेवढे करून मोकळा होत असतो. हे योग्य आहे का?

माझ्यात सत्याविषयीचा गोंधळ अथवा व्याजाविषयीचा गोंधळ जसा आहे, तसाच 'आवश्यकतेहून अधिक असलेले गरजवंतांना देऊन टाका, आपल्या प्रिय वस्तू गरजवंतांना दिल्याशिवाय तुम्ही सद्‌वर्तनी होऊ शकत नाही. तसेच वर्षभराच्या उत्पन्नावर अडीच टक्के जकात द्या' या सर्व आदेशांविषयीदेखील गोंधळ आहे. हा गोंधळ दूर करण्याची व्यवस्था आपल्या मुस्लिम समाजात मला तरी आढळली नाही. उत्तरासाठी हाताशी पेशइमाम असतात. जवळच्या अरबी मदरशातील मौलाना असतात. तुम्ही जितक्यांना भेटून चर्चा कराल, तितकी वेगवगळी उत्तरे तुम्हाला मिळतील. कारण प्रपंच करून उरलेल्या रकमेवर जकात द्यावी, की एकूण मिळकतीवर द्यावी? इथे जकात गोळा करणारी यंत्रणा समाजाने अजून तरी निर्माण केलेली नाही. जकात मागणारे अनेक आहेत, पण सार्वजनिक हित जपण्यासाठी गावपातळीवर अथवा प्रत्येक मशिदीगणिक जकात गोळा करणारी नियमित यंत्रणा नाही. म्हणून व्यक्तिशः आपल्या मनाला पटेल तसे आपण करीत राहतो. हे चूक आहे की बरोबर आहे ते समजावून सांगणारी विश्वासार्ह, विश्वसनीय व्यवस्था असायला नको का? वारसदारांमध्ये संपत्तीच्या वाटणीच्या अधिकारांविषयीदेखील असाच गुंता खेडोपाडी पाहायला मिळतो. त्याचे काय करायचे?

मी रमजान ईदनिमित्ताने सदरा-फितरा-खैरात-जकात जी काही आहे, ती आपल्याला जमेल तशी गरिबांना देऊन टाकतो नि मग वर्षभर त्याविषयी फारसा विचार करीत नाही. मागायला कुणी आले तर मशीद बांधण्यासाठी, दीनी मदरसा चालवण्यासाठी घडेल तितकी मदत करतो. त्याहून अधिक फारसे काही करीत नाही. दारी आलेल्यांना तर काही ना काही किरकोळ देतच असतो. या सर्वांचा आपण कधी हिशोब करीत नाही, की हिशोबही ठेवत नाही. मदत करायलादेखील बसून राहणाऱ्या लोकांना गरीब माणसं विचारपूस करून शोधावी लागतात. कधी-कधी न्याय करण्याची वेळ आलीच तर आपण सोय पाहतो, आपला-तुपला पाहतो. वय जसजसे वाढत जाते, तसतसी आयुष्यात किरकोळ चोरी करतो, करमणुकीच्या नावाखाली कधीकधी जुगार खेळतो, मोह पडल्यामुळे अथवा मनोविकार-मनोवासना अनावर झाल्याने व्यभिचारही करतो, मित्रांच्या मैफिलीत कधी-













कधी दारूही पितो. म्हणजे जे-जे धर्माने नको म्हणून सांगितले आहे, ते-ते सर्व माझ्या हातून किरकोळ प्रसंगी होऊन गेलेले आहे. चुकांची जाणीव होताच मनात शरमिंदगीचा भाव दाटून येतो. तेव्हा क्षमायाचना करतो, जमेल तसे प्रायश्चित्त घेतो अन् मग सगळेच विसरून जातो. प्रसंगानुरूप माझ्या चुका, माझे गुन्हे मनातल्या मनात डाचत राहतात. त्यामुळे कुठले तरी जमणारे सत्कर्म करून मनाचे सांत्वन करून जगत राहतो. मी किती अपूर्ण आहे ते तेव्हा कळते, मी किती क्षुद्र आहे ते कळते. म्हणून कोणताही आव न आणता जगू शकतो. या चुकांबरोबरच इबादतीच्या चुकाही घडत राहतात. नमाज तर चुकत असते, रोजाही चुकतो.

यासाठी कोणत्या तरी बहाण्याने काही लोकांना जेवण देऊन मनावर आलेले ओझे दूर करतो. धर्मतत्त्वांच्या आचरणाची माझी टक्केवारी उत्तीर्ण होण्यापुरती असावी यासाठी मी धडपडत असतो. क्षमा-प्रार्थना करीत राहतो, तरीही मनात खदखद उरतेच. ही खदखद भोवतालच्या माणसांना शक्य ती, माझ्या आवाक्यात असलेली मदत करून दूर करण्याचा प्रयत्न करतो. पण जेव्हा मी माझ्या मनोवासनांचा विचार करतो, तेव्हा वरील चुकांपेक्षा किती तरी चुका झालेल्या आहेत, हे लक्षात येते. कारण मनोवासनांनी माझ्यावर अत्यंत गुप्तपणे एकहाती राज्य केलेले आहे. जेवढ्या चुका झालेल्या आहेत, तेवढ्याच चुका संयम ठेवल्याने टळलेल्याही आहेत. पण त्यांच्या आठवणी सलत राहतात. हे फक्त मला आणि ईश्वरालाच माहीत आहे. त्याचे काय करायचे, हा माझ्यासमोरील भला मोठा प्रश्न आहे. अशा प्रकारे माझ्या आचरणातील इस्लाम आणि मूळ आदर्श इस्लामच्या आचरणात फरक पडत जातो. कारण माणूस म्हणून मी दुबळा आहे, स्वार्थी आहे, कृतघ्न आहे, अपूर्ण आहे. आद्य प्रेषित आदमसाहेबांनी चूक केली, म्हणून मानवसृष्टी जन्माला आलेली आहे. त्यामुळे माणूस मूळचाच स्खलनशील आहे. म्हणून मी मनातल्या मनात ईश्वराची माफी मागत राहतो. प्रायश्चित्त करीत राहतो. त्यामुळे मी भांडखोर झालो नाही. मी पुरुष म्हणून अर्धा आहे. ती स्त्री म्हणून अर्धी आहे. ती दोघं एकत्र येऊन एक झाली, तर पूर्णत्व येऊ शकते. पण माणूस चंचल आहे. या चंचलपणामुळे माणसाच्या आवडी-निवडीत फरक पडत जातो. त्यामुळे मी मोहांना बळी पडत जातो. म्हणून मी शारीरिक-वाचिक म्हणजे शाब्दिक आणि आर्थिक इबादतीच्या रूपात माफी मागत राहतो, मागतच राहतो. सामाजिक माफी माणसांची आणि इबादतीची माफी ईश्वराची मागत राहतो. कारण तो परमदयाळू अन् परमकृपाळू आहे. काठावरची का असेना- सद्‌गती मिळेल, या आशेवर जगत राहतो. मी असे जगतो आहे आणि तुम्हीदेखील असेच जगत असाल, म्हणून मी माझे मन मोकळे करीत आहे.

दीनदारीशी निगडित काही प्रश्नांचा माझ्या मनातील गुंता सांगून आतले मन मोकळे झाले, तरी पण या दुनियादारीतील प्रश्नांचा गुंताही संपूर्ण मन मोकळे होण्यासाठी सांगायला हवा. आपल्या उलेमांनी व पेशइमामांनी मनावर घेऊन, एकत्रित येऊन इथल्या मुसलमानांतील जातिभाव, वंशभाव आणि पंथीय भाव दूर करण्याच्या मोहिमा आखून त्या सतत काही वर्षे राबवाव्यात. त्यांच्या अशा समाजसेवेची आज अत्यंत गरज आहे. अशा प्रबोधनाने आपल्यातील वैरभाव, दुजाभाव व भेदभाव, द्वेषभाव कमी होऊन आपल्यातील भांडणे-मारामाऱ्या कमी होतील. आपल्यात अशा प्रबोधनाने उत्साह संचारेल, आपली संघर्षशक्ती वाढेल, आपल्या समाजाचा विश्वास अजूनही उलेमांवर व पेशइमामांवर आहे. सारा समाज त्यांचेच ऐकत आला आहे. राजकारण आणि पुरोहितशाही या बाबी सोबत न आणता समाजाचे हे दोन ठळक प्रमुख दोष दूर करण्याची समाजसेवा त्यांनी करावी, ही माझी त्यांना नम्र विनंती आहे. असे त्यांनी केले, तर माझ्यासारख्या फाटक्यांना खात्रीने इस्लामच्या समतेविषयी-शांतीविषयी बोलता येईल. दुनियादारीतील ही जातिव्यवस्था आणि फिरक्यांची विविधता मला चैन पडू देत नाही. मी सतत अस्वस्थ होत राहतो. मी साधा मुसलमान असलो, तरी मलाही मन आहे ना? मलाही थोडीफार बुद्धी आहे ना? म्हणूनच तर ही दिल की बात सांगतो आहे.

भारतीय मुस्लिम समाजाला असलेला तिसरा रोग दारिद्र्याचा आहे. तो उपभोगशून्य स्वामी असलेल्या पैगंबरसाहेबांनी लादून घेतलेल्या दारिद्र्याचे उदाहरण देऊन दुर्लक्ष करण्याजोगा नक्कीच नाही. प्रत्येक खेड्यातील आणि शहरातील सर्वच पेशइमामांनी एकत्र येऊन ‘मुस्लिम समाज जकात कमिटी’ स्थापन करून ती धर्मादाय आयुक्तांकडे नोंदवून घ्यावी. गावातील, शहरातील मुसलमानांची जकात, फितरा, सदका आणि खैरात जकात त्या कमिटीच्या बँक खात्यात जमा करावी. कमिटीच्या सल्ल्यानुसार जकात कमिटीचा बँकेतील पैसा गावातील बेकार गरजू तरुणांना धंद्यासाठी, धंदेशिक्षणासाठी द्यावा. गरजेनुसार अडलेल्या गरिबांनाही द्यावा. तरुण स्वतःच्या पायावर उभा राहिला, तर मुस्लिम समाजही हळूहळू उभा राहू शकेल. शहरातील जकात कमिटीची मशिदीगणिक पेशइमामाद्वारे मोहल्ल्यानुसार ही व्यवस्था करता येईल. दारिद्र्य कमी झाले तर शिक्षणही घेता येईल. हा रोग सार्वत्रिक असल्याने त्यासाठी प्रत्येक फिरक्याच्या पेशइमामांनी आणि उलेमांनी याबाबतीत पुढाकार घेण्याची अत्यंत गरज आहे. तसेच जाणत्या उलेमांनी शिक्षण म्हणजे दीनी शिक्षणासह आधुनिक शिक्षणही असते, असे दीनी शिक्षणापर्यंतच शिक्षणाला मर्यादित करणाऱ्यांना खडसावून सांगायला पाहिजे. सोनाराने कान टोचले, तर कान दुखत नसतात. जर सगळेच फिरके जवळ आले, तर न्यायाच्या चारी परंपराही एकत्र येऊ शकतील. इतिहासकाळात झाले ते झाले; वर्तमानात

सगळ्याच उलेमांनी एकत्र येऊन प्रयत्न केले, तर काय शक्य नाही? म्हणून दीनदारीत आणि दुनियादारीत समतोल साधणे सोपे होऊन जाईल.

मुस्लिम समाजात सर्वदूर असलेल्या दारिद्र्यामुळे शिक्षण घेता येत नाही आणि शिक्षण नसल्याने दारिद्र्य वाढत चालले आहे. हा पेच उलेमांनी सोडवायलाच हवा. कारण मुसलमान त्यांचेच तर ऐकतात. आपण लोकशाहीतील भांडवलशाही व्यवस्थेत जगत आहोत. वेळेची अन् परिस्थितीची नजाकत लक्षात घेऊन अडचणीत आपल्या परंपरांचा, आपल्या शरियतचा नवा अन्वयार्थ लावायला हवा, तरच मुस्लिम समाज विस्कळित होत राहणार नाही. लोकशाहीचे भान ठेवून सनदशीर मार्गाने मुसलमानांच्या दारिद्र्यासाठी शिक्षणातील मागासलेपणासाठी उलेमा रस्त्यावर उतरले, तर समाजही त्यांना पाठिंबा देईल.

लोकाशाहीत क्षुल्लक व किरकोळ धर्मांतर होतच असते. त्याचे सुख-दुःख मानण्याची, अभिमान अथवा हिरमोड करून घेण्याची गरज नाही. विविध हेतूंनी अथवा कारणांनी इकडचे तिकडे येत-जात असतात. तिकडे लक्ष देण्यापेक्षा आपल्या खऱ्या दीनकडे आणि आधुनिक शिक्षणाकडे सारा जोर लावला पाहिजे. आपण आपली शैक्षणिक समृद्धी वाढवण्यासाठी झटले पाहिजे. प्रपंच करून इबादतीबरोबर आपण सगळ्यांनी हेच केले पाहिजे. तरच आपल्या समाजाचा हरवलेला आत्मा पुन्हा गवसेल. जगाकडे डोळे लावून बसण्यापेक्षा आपल्या समाजाकडेच विशेष लक्ष पुरवले पाहिजे, कारण आजच्या काळात 'या शेख अपना अपना देख' हीच म्हण खरी ठरते आहे. आपल्याला कामातून मोकळे झाल्यानंतर इबादतीच्या परिश्रमाला लागायला हवे. कारण मुसलमानांनी कयामतीचा क्षण येईपर्यंत निरंतर कर्म करीत राहिले पाहिजे. हे जग, ही दुनियादारी दोन दिवसांचा खेळ-तमाशा असली तरी दीन आणि दुनियादारीमध्ये समतोल साधून सुवर्णमध्य शोधायलाच हवा, अशीच आपल्या पालनकर्त्याची इच्छा आहे. कोणत्याही एका बाजूला झुकू नये. एकाच बाजूला झुकून अतिरेक करू नये. मध्यम मार्गाचाच अवलंब सतत करायला हवा, अशीच तर जगन्नियंत्याची प्रमुख इच्छा आहे. तडजोड करीत राहणे नेहमीच बरे असते. नाही तर मोडून पडायला आपल्याला असा कितीसा वेळ लागणार आहे?

आपण भारतीय मुसलमान आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रांतांतील मुसलमानांच्या प्रत्यक्ष जगण्यात, त्यांच्या दुनियादारीत, त्यांच्या पेहरावात, खानपानात, रूढी-परंपरांमध्ये, त्यांच्या भौगोलिक संस्कृतीत काय काय फरक आहे हे फारसे लक्षातच घेत नाही. त्यांच्यात त्यांच्या जुन्या जगण्याचे अवशेष असतात, जे कशानेही मिटत नसतात. त्यांना त्यांची दीनदारी त्यांच्यातील जुन्या अवशेषांना लक्षात घेऊन सांगायला हवी. कारण ते का आणि कसे मुसलमान झाले, हे आपण लक्षात घेतलेच पाहिजे, असे सूफींनी केलेले आहे. पण आपण सूफींकडे दुर्लक्ष करतो. सूफींची इबादत, त्यांनी प्रचंड कुर्बानी देऊन केलेली लोकसेवा, त्यांचे वैचारिक-आध्यात्मिक ग्रंथ, भारतानुकूल तत्त्वज्ञान आपण गंभीरपणे लक्षातच घेत नाही. सूफींच्या कार्यामुळेच तर इथे मुस्लिम समाज अस्तित्वात आला आहे, हे आपण नाकारू शकत नाही. आपल्याला कळालेल्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा अतिरेक करून सूफींना नाकारणे भारतीय मुसलमानांना परवडण्यासारखे नाही. कारण इथे भारतात सुखा-समाधानाने सहजीवन जगायचे असेल तर आज आणि आता सूफी तत्त्वज्ञानासारखा दुसरा कोणताही योग्य पर्याय उपलब्ध नाही. सूफींकडे दुर्लक्ष करून आपण काय केले, तर- आपल्याच धर्मांतरित मुसलमानांना अस्पृश्य ठेवले, त्यांना नीच समजून त्यांना कमअस्सल-कमिने ठरवले. अस्सल मुसलमानांच्या तोऱ्यात फुकट उच्च कुलीनतेचा टेंभा मिरवण्यासाठी इथली विषारी जातिव्यवस्था स्वीकारली. सामान्य मुसलमानांचे शोषण करणारी पुरोतहितशाही स्वीकारली. राजकारण करून छोटे-छोटे फिरके गट-तट पाडून स्वतःच्या समाजाचे तुकडे-तुकडे करीत राहिलो. 'हे सगळे मूळ इस्लाममध्ये आहे का?' असा प्रश्न स्वतःला विचारला म्हणजे तुम्हालाही जाणवेल की, आपल्या मुस्लिम समाजाचा आत्मा हरवलेला आहे. तो आपल्याला परत मिळवण्यासाठी सूफी तत्त्वज्ञानच विचारपूर्वक स्वीकारायला हवे. धर्मपंडित असलेल्या जाणत्या उलेमांनी आणि त्यांच्या हातात असलेल्या पेशइमामांच्या अदृश्य साखळ्यांनी पुढाकार घेतला, तरच हे शक्य आहे; नाही तर मुस्लिम समाज आत्मा हरवलेल्या अवस्थेत तुकड्या-तुकड्यांनी जगत राहील, मागे-मागे पडत राहील.

माणूस ही सर्वश्रेष्ठ ईश्वराची सर्वोत्तम निर्मिती आहे. म्हणून तर चिखल-मातीपासून निर्माण केलेल्या आद्य प्रेषित आदमसाहेबांना म्हणजे आद्य मानवाला ईश्वराच्या सर्वच फरिश्त्यांनी सजदा केला. मध्ययुगीन राजदरबारात फरशी सलाम, फरशी आदाब अर्ज रूढ होता. आपण मुसलमान


Date of Publication : 12-11-2020

दैनंदिन नमाजात मातृभूमीवर नाकासह कपाळाला घट्टे पडले तरी आपला माथा मनोभावाने टेकवत असतो. आपली नमाज-प्रार्थना आपण केलेल्या नियतीवर म्हणजे निश्चयावर आधारलेली असते. आपली ही नमाज-प्रार्थना शारीरिक-शाब्दिक-मानसिक व आर्थिक स्वरूपाची असते. मनं जोडणे, दिलजमाई करणे हीदेखील आपली इबादत-उपासनाच असते. नामस्मरण सतत करणे- जिक्र करणे हासुद्धा आपल्या इबादतीचा भाग आहे. या साऱ्या बाबी लक्षात घेऊन आपण कमरेत झुकून आदाब अर्ज करणे, पाया पडून नमस्कार करणे, शाब्दिक वंदे मातरम् म्हणून वंदन करणे, लवून सलाम करणे अथवा गळाभेट करून पोटात शिरणे यांचा आपल्या इबादत-प्रार्थनेच्या संदर्भात विचार केला तर असे दिसून येईल की- असा सलाम करताना किंवा वंदन करताना आपण मनात ईश्वराचे नाव घेऊन नियत करीत नसतो. सलाम-नमस्कार-वंदन, वडिलधाऱ्यांचे चरणस्पर्श करणे हा आपला नियत केल्याविना व्यक्त झालेला सहजभाव आहे. त्यामुळे सलाम-नमस्कार-वंदन-चरणस्पर्श करणे हा आपल्या इबादतीचा भाग होऊ शकत नाही. म्हणून वंदन करणे धर्मविरोधी कसे काय ठरवता येईल? शब्दशः अर्थ घेतला, शब्द प्रमाण मानून अर्थ लावला की, घोटाळे निर्माण होत असतात. म्हणून मुसलमानांना डिवचण्यासाठी उकरून काढल्या जाणाऱ्या मुद्द्यांवर आपण घाई-गडबडीत संवेदनशील होणे नेहमीच टाळले पाहिजे. धर्मपंडित असलेल्या जाणत्या उलेमांच्या मदतीने त्यातून काहीएक मध्यम मार्ग शोधायला हवा. कारण असे प्रसंग मुद्दामहून उचलले जातात. माझ्या आईचे, आजीचे, गुरूचे, संत-महात्मे सूफी अवलियाविषयींचा आदरभाव व्यक्त करण्यासाठी मी जी शारीरिक आणि शाब्दिक कृती करीत असतो, तिचा संबंध आपल्या सार्वजनिक इबादतीशी जोडू नये. कारण ही कृती मी वजू करून, नियत करून, स्वच्छ स्थळी मनोभावे केलेली असेल, याची खात्री देता येत नाही. शिवाय मी त्या क्षणी पूर्ण शरणागतीही पत्कारलेली नसते. आपल्या निष्ठेचा, आध्यात्मिकतेचा, वैयक्तिक पातळीवरील इबादतीचा आपण कधीच जाहीर उच्चार करीत नसतो, की कधी गर्वाने तिचा अभिमानही बाळगत नसतो. त्यामुळे उलेमा-अवलियांशिवाय दुसऱ्यांनी धर्माविषयी सार्वजनिक ठिकाणी जाहीरपणे काही ठामपणे बोलू नये. आपापसात खासगी चर्चा तर आपण करीतच असतो, म्हणून सार्वजनिक ठिकाणी जाहीर न बोलण्याचे पथ्य माझ्यासारख्यांनी आणि राजकारणातल्यांनी पाळायलाच हवे; म्हणजे घोटाळे होण्याची शक्यता टळेल.

भारतीय हिंदू-मुस्लिम यांनी परस्परांना डिवचण्यातूनच वंदे मातरम्‌चा मुद्दा, गोमातेचा मुद्दा, मंदिर-मस्जिदचा मुद्दा, निष्ठेशी संबंधित राष्ट्रभक्तीचा मुद्दा सतत घोळवत ठेवला जात असतो. त्यांच्या जोडीला कधी रस्त्यावर पढल्या जाणाऱ्या नमाजचा मुद्दा तर कधी धर्मांतराचा, घरवापसीचा, लव्ह जिहादचा मुद्दा धुमसवत ठेवून पेटवला जातो. आजपर्यंत आपण सर्वांनी या मुद्द्यांमुळे झालेल्या दंगलींचा अनुभव घेतलेला आहे. या दंगलीमुळे मुसलमानांचा मागासलेपणाच वाढत गेलेला आहे. हा मागासलेपणा आज शिखरावर पोचला आहे. म्हणून जाणत्या उलेमांनी व जाणत्या राजकारण्यांनी देशपातळीवर एकत्र येऊन या आणि यांसारख्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी दीनबरोबर लोकशाहीसह भांडवलशाहीचाही विचार करायला हवा. लोकशाहीतील सुखकर सहजीवनासाठी माणुसकीला केंद्र मानून मानवतावादी विचारविनिमय करण्यासाठी उलेमा आणि राजकारण्यांनी आपल्यासोबत इस्लामच्या अभ्यासकांना-संशोधकांनाही घ्यावे. हे सारे प्रश्न आपल्या जगण्या-मरण्यावर बेतणारे आहेत, म्हणून आपसातील सारे मतभेद बाजूला करून शांतचित्ताने काही तोडगे-मार्ग शोधून काढायला हवेत. शाहीनबागचा लढा लोकशाही मार्गाने जात असलेला आहे. मुसलमानांनी आपले प्रश्न याच मार्गाने सोडवायला हवेत. घरी आणि मस्जिदीत, दर्ग्यात आपापली इबादत करून सार्वजनिक ठिकाणच्या दुनियादारीत आपल्या हाती सतत राज्यघटनाच असायला हवी; तरच हे डिवचा-डिवचीचे मुद्दे अंगावर धावून येत आपल्या मनाची घुसमट करणार नाहीत, की आपल्या मनाचा तिळपापडही होणार नाही. दीन आणि दुनियेत समतोल निर्माण होईल. हे असे माझ्या मनातील कोरोनामुळे अनिवार्य झालेल्या गोश्यात पाहिलेले सुखकर सहजीवनाचे स्वप्न आहे. इथले सारेच लोक धर्मग्रंथ असणारे ग्रंथसमृद्ध लोक आहेत. त्यांना माझे हे स्वप्न नक्कीच कळेल, याची मला खात्री आहे.

**फ. म. शहाजिंदे**
Mob. 9421376656




Date of Publication : 12-11-2020